# स्नेह समृध्दी मंडळ, देवरुख

## वार्षिक अहवाल २०२२/२३

स्नेह समृध्दी मंडळ या सामाजिक संस्थेच्या सन २०२२/२३ या वर्षामध्ये कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे पुढीलप्रमाणे कार्यक्रम/उपक्रम राबविण्यात आले.

### * महिला सक्षमिकरण अंतर्गत घेण्यात आलेले कार्यक्रम :-

| अ.क्र. | कार्यक्रमाचे नाव | ठिकाण | सहभागी संख्या |
|---|---|---|---|
| १. | आधारगटांची नव्याने स्थापना करण्यासंबंधी भेट व चर्चा | आंबव, कानारकोंड, धामापूर. | २२ |
| २. | समुपदेशन | जुन्या केसेसना फोन संपर्कातून समुपदेशन | १६ |
| ३. | महिलागट संपर्क आणि बैठका | धामापूर, मानसकोंड, कानरकोंड, आंबव इ. | ५० ते ५५ |

### * शैक्षणिक प्रकल्पा अंतर्गत पुढीलमाणे उपक्रम राबविण्यात आले :-

१) <u>विमलताई पित्रे सुकन्या योजना</u> :- पित्रे फाऊंडेशन देवरुख यांच्या मार्फत "विमलताई पित्रे सुकन्या योजना" अंतर्गत सन २०२१/२२ ते २०२३/२४ या तीन वर्षांच्या कालावधीकरिता संस्थेच्या कार्यक्षेत्रामधील आर्थिक दृष्टया गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक आर्थिक मदत करण्यात येणार आहे. त्यानुसार सन २०२२/२३ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांना मदत करण्यात आली.

| "विमलताई पित्रे सुकन्या योजना" अंतर्गत लाभार्थी संख्या | | |
|---|---|---|
| गावांची संख्या | विद्यार्थी लाभार्थी संख्या | विद्यार्थी लाभार्थी रक्कम |
| ३१ | ६५ | ३,००,०००/- |

२) <u>शैक्षणिक प्रकल्पाला मदत केलेले इतर देणगीदार</u> :- संस्थेच्या शैक्षणिक प्रकल्पाला समाजातील काही संवेदनशिल व्यक्तींकडून सन २००७ पासून मदत करण्यात येत आहे. त्यानुसार सन २०२२/२३ या शैक्षणिक वर्षामध्ये पुढीलप्रमाणे विद्यार्थ्यांना मदत करण्यात आली.

| देणगीदारांची संख्या | गावांची संख्या | विद्यार्थी लाभार्थी संख्या | विद्यार्थी लाभार्थी रक्कम |
|---|---|---|---|
| १५ | २१ | २८ | ७१,८६९/- |

३) <u>श्रीमती धनश्री हळबे शिष्यवृत्ती</u> :- संस्थेच्या शैक्षणिक प्रकल्पाला इतर देणगीदारांसोबतच संस्थेच्या कार्यक्षेत्रातील समाजातील गरीब व गरजु घटकांप्रती संवेदशिल असणाऱ्या श्रीमती धनश्री हळबे यांनी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील एका अत्यंत गरिब विद्यार्थीनीकरिता यावर्षी म्हणजे सन २०२२/२३ पासून शिष्यवृत्ती योजना सुरु केली आहे. त्यांच्यामार्फत संस्थेला रु.१,००,०००/- रोख रक्कम देण्यात आली आहे. त्याच्या माध्यमातून संस्थेने या विद्यार्थीनीला दरवर्षी शैक्षणिक आर्थिक मदत करावयाची आहे.



लाभार्थी विद्यार्थी धनादेश वाटप



श्रीमती धनश्री हळबे शिष्यवृत्ती लाभार्थी विद्यार्थिनी

* शैक्षणिक प्रकल्पाबाबत पालकांपर्यंत माहिती मिळावी म्हणून शिक्षकांनी पालकांसमवेत मुलांच्या बैठका आयोजित करुन संस्थेला मार्गदर्शक म्हणून निमंत्रित केले. यामध्ये पुढील शाळांचा समावेश होता - माध्यमिक शाळा वांझोळे, माध्यमिक शाळा वाशी आणि जि.प.शाळा मोर्डे .



जि.प.शाळा मोर्डे



माध्यमिक शाळा वांझोळे

*** विद्यार्थिनी सर्वांगिण विकास प्रकल्प :-** स्नेह समृध्दी मंडळ व "परिवर्तन ८४, मुंबई" यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये विद्यार्थिनी सर्वांगिण विकास प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पाअंतर्गत ग्रामीण भागातील संगमेश्वर तालुक्यातील १२ ते २० वयोगटातील मुलींकरिता सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने हा प्रकल्प राबविण्यात आला. या प्रकल्पाअंतर्गत ग्रामीण भागातील किशोरी व युवतींचे गट स्थापन करुन त्यांच्या मार्गदर्शनाकरिता बैठका घेण्यात आल्या.

| गावांची संख्या | माध्यमिक शाळांची संख्या | बैठकींची संख्या | एकूण मुली | मार्गदर्शक |
|---|---|---|---|---|
| १४ | ५ | प्रत्येक गावासाठी ३ ते ४ बैठका | २९६ | १) सुनिता माईन<br>२) नयन शिंदे<br>३) शैलजा कांगणे<br>४) श्रावणी काबदुले<br>५) वैभव गवंडी |

त्याचप्रमाणे त्यांच्याकरिता विशेष प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आले. याकरिता तज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ.विशाल शिर्के, श्री.समीर काबदुले, श्री.रामचंद्र देशपांडे, श्री.कानर सर, सौ.मनाली जाधव व सौ.श्रध्दा देशपांडे यांना निमंत्रित करण्यात आले. त्यामध्ये पुढीलप्रमाणे विषय घेण्यात आले.

१) आरोग्य विषयक मार्गदर्शन

२) क्रिडा विषयक मार्गदर्शन

३) करिअर मार्गदर्शन

४) कुटूंबजीवन शिक्षण कार्यक्रम



किशोरी/युवतींकरिता बैठकांचे आयोजन



किशोरी/युवतींकरिता प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन

## * संस्थेमार्फत राबविण्यात आलेले विशेष कार्यक्रम :-

### १) <u>क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कार्यक्रम</u> :-

दिनांक ०३/०१/२०२३ रोजी " क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती" निमीत्ताने स्नेह समृध्दी मंडळ या संस्थेच्या प्रकल्प कार्यालयामध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पोलीस महिला दक्षता प्रतिनिधी, कॉलेज प्राध्यापिका, वकील, सामाजिक कार्यकर्त्या, समुपदेशन सल्लागार सदस्य, महिला बालकल्याण विभाग संगमेश्वर(देवरुख), गृहीणी आणि संस्थेचे पदाधिकारी व सहकारी उपस्थित होते. त्याचप्रमाणे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले" यांच्या जयंतीनिमीत्त आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेमध्ये संस्थेच्या शैक्षणिक प्रकल्पातील अनेक विद्यार्थी-विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता.




### २) <u>रत्नागिरी CBO प्रतिनिधींचे प्रशिक्षण कार्यक्रम</u> :-

रत्नागिरी जिल्हयात बालकांविरोधी लैंगिक हिंसाचार आणि अपराधाच्या केसेस यांची वाढ झालेली आहे. यासाठी जिल्हातील सामाजिक जबाबदारी म्हणून या समस्येबाबत जागृतीची गरज अनेक जबाबदार घटकांनी व्यक्त केली होती. म्हणून रत्नगिरी जिल्हयात विकासात्मक काम करणाऱ्या संस्था, संघटना, बचतगट, अंगणवाडी ताई, उमेद संस्था यांच्यासाठी प्रेरणा संस्था मुंबई व स्नेह समृध्दी मंडळ साडवली यांच्या मार्फत दिनांक २४/०३/२०२३ व २५/०३/२०२३ अशी दोन दिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेला प्रमुख मार्गदर्शक "परिवर्तन ८४" मुंबई या संस्थेचे कार्यकारी विश्वस्थ डॉ.प्रविण पाटकर, "प्रेरणा" संस्था, मुबई च्या संस्थापक मा. प्रीती पाटकर, श्री.राम देशपांडे, CWC प्रतिनिधी श्री.शिरीष दामले, श्री.राजकुमार ससपदे भारतीय समाजसेवा केंद्र, चिपळूण या मान्यवरांनी उत्कृष्ठ पध्दतीने मार्गदर्शन केले.



रत्नागिरी CBO प्रतिनिधींचे प्रशिक्षण कार्यक्रम

३) स्नेह समृध्दी मंडळ संस्थेच्या कार्याचा गौरव कार्यक्रम कानरकोंड :-

कानरकोंड आंबेड बुद्रुक तालुका संगमेश्वर येथील प्राथमिक शिक्षक बंधु यांच्या सहकार्याने शिक्षक आणि ग्रामस्थ यांच्यामार्फत सन्माननिय सरपंच आणि उपसरपंच यांच्या उपस्थितीमध्ये अतिशय उत्तम कार्यक्रमाचे संयाजन करण्यात आले होते. स्नेह समृध्दी मंडळ या सामाजिक संस्थेच्या कार्याचा गौरव व त्यांनी शालेय विद्यार्थ्यांना केलेल्या आर्थिक सहकार्याबद्दलचा आभार प्रदर्शन सोहळा संस्थेला सन्मानचिन्ह देऊन पार पडला.



संस्थेच्या कार्याचा गौरव कार्यक्रम कानरकोंड

४) भारतीय स्त्री-शक्तीच्या पदाधिकारींची संस्थेला भेट :-

संस्थेचे पदाधिकारी आणि कार्यक्षेत्र पातळीवरील काम करणारे स्वयंसेवक व कार्यकर्ते यांची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये संस्थेच्या कार्याचा अहवाल आणि भारतीय स्त्री-शक्तीच्या राज्यव्यापी सुरु असणाऱ्या कामाची ओळख अशा विषयांचा समावेश होता. त्यानंतर संस्थेच्या कार्यक्षेत्राला भेट यामध्ये नर्सरी-कासारकोळवण, महिलांची केटरिंग सेवा माध्यमातून रोजगार निर्मीती करणाऱ्या गटाला प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट व चर्चा.



भारतीय स्त्री-शक्तीच्या पदाधिकारींची संस्थेला भेट

५) <u>जिल्हा परिषदेच्या अंगणवाडीच्या मुलांसोबत वाढदिवस साजरा</u> :-

संस्थेच्या मार्फत संस्थेचे स्वयंसेवक व देणगीदार श्री.अतिश देशपांडे व जुई देशपांडे या उपयतांनी त्यांचा मुलगा निषाद याचा पहिला वाढदिवस संस्थेच्या कार्यक्षेत्रातील तळवडे या गावातील अंगणवाडीमध्ये साजरा केला. यामुळे या अंगणवाडीमधील मुलं, पालक, अंगणवाडी सेविका, मदतनिस व गावातील ग्रामस्थांनी आनंद व्यक्त करुन संस्थेचे आभार मानले.



तळवडे अंगणवाडीध्ये वाढदिवस साजरा

६) <u>संस्थेच्या कार्यालयाचे नुतनिकरण उद्घाटन कार्यक्रम</u> :-

स्नेह समृध्दी मंडळ संस्थेच्या प्रकल्प कार्यालयाचे नुतनिकरण करण्यात आले. यामध्ये कार्यालयाला रंगकाम करणे, नवीन कारपेट बसविणे, सिलींग करणे व फर्निचर बदलणे असे काम करण्यात आले. कार्यालय नुतनिकरणाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी संस्थेच्या अध्यक्षा, सचिव, व्यवस्थापक, सर्व कार्यकर्ते तसेच संस्थेचे सल्लागार, मार्गदर्शक व हितचिंतक उपस्थित होते. याप्रसंगी सर्वांनी संस्थेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे कौतुक करुन त्यांना शुभेच्छा दिल्या.



संस्थेच्या कार्यालयाचे नुतनिकरण उद्घाटन कार्यक्रम



संस्थेच्या कार्यालयाला संस्थेच्या स्वयंसेवकांची सदिच्छा भेट

## ⁕ संस्थेच्या प्रतिनिधींचा विशेष कार्यक्रमांमध्ये सहभाग :-

| अ.क्र. | संस्था प्रतिनिधींचे नाव/पद | ठिकाण | विषय |
|---|---|---|---|
| १. | श्रध्दा रा. देशपांडे – अध्यक्षा<br>नयन रा.शिंदे – कार्यक्रम अधिकारी | ऑनलाईन | भारतीय स्त्री-शक्ती विभाग बैठक – कार्यपध्दती, उपक्रम व प्रकल्प आढावा. |
| २. | नयन रा. शिंदे – कार्यक्रम अधिकारी | रत्नागिरी | उमेदचे जिल्हास्तरिय पदाधिकारी व सहाय्यक यांच्यासमवेत बैटक – गटांबाबत सहयोगिनींना संस्थेने सहकार्य करावे याबाबत चर्चा. |
| ३. | श्रध्दा रा. देशपांडे – अध्यक्षा<br>नयन रा. शिंदे – कार्यक्रम अधिकारी<br>श्रावणी स.काबदुले – डेटा ऑपरेटर | ऑनलाईन | भारतीय स्त्री-शक्ती अंतर्गत विशेष बैठक – महिलांसाठी आर्थिक विकास साक्षतरता. |
| ४. | नयन रा. शिंदे | देवरुख | सम्यक संस्था, पुणे अंतर्गत सुरक्षित गर्भपात या विषयावर घेण्यात आलेली तीन दिवशीय कार्यशाळा. |
| ५. | श्रध्दा रा. देशपांडे – अध्यक्षा<br>नयन रा शिंदे – कार्यक्रम अधिकारी | पूणे | राज्यस्तरीय संस्था परिषद – सर्व संस्थांचे नेटवर्क तयार करणे, त्यांना वेगवेगळया सेवा देणे या उद्‌देशाने सेवावर्धिनी संस्था, पुणे यांना २५ वर्षे पूर्ण झाली म्हणून सेवातरंग या अंतर्गत राज्यस्तरीय संस्था परिषद आयोजित करण्यात आली. |
| ६. | श्रध्दा रा. देशपांडे – अध्यक्षा<br>नयन रा. शिंदे – कार्यक्रम अधिकारी<br>श्रावणी स. काबदुले – डेटा ऑपरेटर | ऑनलाईन | भारतीय स्त्री-शक्ती अंतर्गत विशेष बैठक – भारताच्या प्रगतीतील महिलांचा सहभाग. |
| ७. | नयन रा. शिंदे – कार्यक्रम अधिकारी<br>श्रावणी स. काबदुले – डेटा ऑपरेटर | पोलीस ठाणे, देवरुख | सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग. |
| ८. | श्रध्दा रा. देशपांडे – अध्यक्षा | रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे | राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान २०२२/२३ अंतर्गत महिला स्नेही आणि बाल स्नेही पंचायत प्रशिक्षण कार्यकमासाठी प्रशिक्षक म्हणून सहभाग. |
| ९. | श्रध्दा रा. देशपांडे – अध्यक्षा | पूणे | यशदा, पूणे – शाश्वत विकास ध्येय्य स्थानिकीकरण अंतर्गत राज्यस्तरिय कार्यशाळा सहभाग. |

| अ.क्र. | संस्था प्रतिनिधींचे नाव/पद | ठिकाण | विषय |
|---|---|---|---|
| १०. | नयन रा. शिंदे - कार्यक्रम अधिकारी | देवरुख महाविद्यालय | ८ मार्च महिला दिन निमीत्त आयोजित कर्तृत्ववान महिला सन्मान सोहळा कार्यक्रमामध्ये सहभाग |
| ११. | सुनिता गं.माईन -समुपदेशक | ताम्हाणे (पंचक्रोशी) | रानपाला भाजी प्रदर्शन व मेळावा यामध्ये सहभाग. |


राज्यस्तरीय संस्था परिषद - सेवार्धिनी संस्था



यशदा, पुणे शाश्वत विकास ध्येय स्थानिकीकरण



सम्यक संस्था, पुणे अंतर्गत सुरक्षित गर्भपात विषयी कार्यशाळा



सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये सहभाग.



राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियान


ऑनलाईन मिटींगमध्ये सहभाग


महिला सन्मान सोहळा कार्यक्रमामध्ये सहभाग

## ⁕ संस्थेच्या कार्यालयालामध्ये देण्यात आलेल्या विशेष व्यक्तींच्या भेटी :-

१) डॉ.प्रविण पाटकर – "परिवर्तन ८४" मुंबई या संस्थेचे कार्यकारी विश्वस्थ, यांनी संस्थेच्या प्रकल्प कार्यालयाला भेट देवुन संस्थेचे पदाधिकारी व संस्थेचे कार्यकर्ते यांच्यासोबत आपला अमुल्य वेळ देऊन अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले.

२) मा. प्रीती पाटकर मॅडम – "प्रेरणा" संस्था, मुबई च्या संस्थापक, यांनी संस्थेच्या कार्यालयाला भेट देवून "प्रेरणा" संस्था स्थापन करुन वेश्याव्यवसायातील महिला व मुलांना सुरक्षित वातावरण देऊन त्यांचे शिक्षण व आरोग्य तसेच त्यांचे हक्क मिळवून देण्याचे काम गेली अनेक वर्षे करीत असलेल्या त्यांच्या कार्याचा अनुभव व समाजातील क्रुर आणि लैंगिक शोषणाला बळी पडणाऱ्या पिडीत महिला आणि मुलांची शारिरीक व मानसिक स्थिती किती भयंकर आहे याबाबतचे आपले प्रत्यक्ष केलेल्या कामाची माहिती दिली. यामुळे समाजातील या समस्यांची तीव्रता किती भयंकर आहे याची जाणीव संस्थेचे कार्यकर्ते व पदाधिकारी यांना झाली.

३) १. मा.रागिणी चंद्रादे – भारतीय स्त्री-शक्ती प्रांत सचिव, महाराष्ट्र

२. मा.अर्चना बक्षी – भारतीय स्त्री-शक्ती सहसचिव, महाराष्ट्र यांनी संस्थेचे काम पहाण्यासाठी आणि संस्थेबरोबर भारतीय स्त्री शक्तीचे काम करण्यासाठी भेट दिली.

४) कुमार सरवदे – नगर पंचायत देवरुख, सहाय्यक प्रकल्प अधिकारी – समुपदेशन केंद्राची महिती घेण्यासाठी आणि नगरपंचायतमध्ये ही सेवा जोडून घेता येणेबाबात प्रयत्न.

५) वंदना आचार्य – ई कॉमर्स डायरेक्टर, मुंबई – संस्थेचे काम समजुन घेणे आणि सेवानिवृत्त झाल्यानंतर संस्थेमध्ये समुपदेशक म्हणून महिलांना मोफत सेवा दयावी अशी त्यांनी इच्छा व्यक्त केली.

६) प्राची मोघे – भारतीय स्त्री शक्ती सदस्य, मुंबई – भारतीय स्त्री शक्ती आणि संस्थेसोबत काम करायला आवडेल. संधी मिळाली तर सहकार्य असेल.




डॉ.प्रविण पाटकर व मा.प्रिती पाटकर मा.वंदना आचार्य, प्राची मोघे, रागिणी चंद्रादे आणि अर्चना बक्षी भेट

## * इतर संस्थांसोबत ऑनलाईन पध्दतीने रजिस्ट्रेशन :-

१) नास्कोम फाऊंडेशन

२) टेकसोप इंडिया

३) बेनिव्हिटी ऑर्गनाजेशन

४) प्रोजेक्ट हिना

५) शुन्य ऍडव्हायजर

६) सॉप्ट द नेक्स्ट - या कंपनीला संस्थेने रु.८००० वार्षिक शुल्क भरुन रजिस्ट्रेशन केले. त्यानंतर कंपनीकडून संस्थेला प्रोजेक्टर (सेकंड हॅन्ड) पाठविण्यात आला. तसेच या कंपनीकडून संस्थेच्या कार्यक्षेत्रामध्ये गरजू लोकांना उपयोगी पडतील असे साहित्य देण्यात येणार आहे.




## * संस्थेचे पुढील वर्षामध्ये (सन २०२३/२४) होणारे कार्यक्रम थोडक्यात :-

१) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे दाखले मिळवून देणे प्रकल्प.

२) डि-कॅड महाविद्यायल, देवरुख आर्थिकदृष्टया गरजू विद्यार्थी निवड प्रक्रिया प्रकल्प.

३) महिलांचे आधारगट पूर्नरचना.

४) ग्रामपंचायत सक्षम होण्यासाठी ग्रामस्थांमध्ये जाणीव जागृती करणे.

५) बालस्नेही आणि महिला स्नेही ग्रामपंचायत होण्यासाठी जागृती करणे.

*****